सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

राष्ट्रोध्दरार्थ तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/उपस्थिती/२०२०/ 2912 दिनांक : 22 SEP 2020

प्रति,

प्राचार्य / संचालक / उपसचिव,
पुणे विभागातील कार्यालयाचे अधिनस्त
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था / कार्यालय.

**विषय : राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा..**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/ प्र.क्र.१७८/विशि-३, दिनांक १८/०९/२०२०.

(२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/ प्र.क्र.१७८/विशि-३, दिनांक २१/०९/२०२०.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने संदर्भित शासन निर्णयान्वये राज्यात विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या / अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यात येत असल्याने विद्यापीठे / शैक्षणिक संस्थेच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची यापुढे १०० टक्के उपस्थिती राहील असा निर्णय घेण्यात आला आहे.

संदर्भ क्रमांक (१) येथील दिनांक १८/०९/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहील.

तसेच परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे / महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावा, यासंदर्भात सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही करावी. (सोबत प्रत जोडली आहे.)

प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

सोबत : वरील प्रमाणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत स्पष्टीकरणात्मक खुलासा.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २१ सप्टेंबर, २०२०.

<u>संदर्भ</u>: शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३, दिनांक १८ सप्टेंबर, २०२०.

<u>प्रस्तावनाः-</u>

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यापुढे १०० टक्के उपस्थित राहण्याबाबत संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांकडून निवेदने प्राप्त झाली आहेत. त्यामुळे याबाबत शासन स्तरावरून स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

उपरोक्त संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक खुलासा करण्यात येत आहेः-

(१) संदर्भाधीन दिनांक १८ सप्टेंबर, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि, सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्याप्रमाणे आवश्यकतेनुसार लागू राहिल.

(२) परीक्षा व परीक्षेशी संबंधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून विद्यापीठे/ महाविद्यालयांनी उपस्थितीसंदर्भात आपल्या स्तरावर गरजेनुसार निर्णय घ्यावा. यासंदर्भात सर्व संबंधित विद्यापीठांनी/ शैक्षणिक संस्थांनी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२००९२११७३५३५२६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pravinkumar Gulabrao Pawar

Digitally signed by Pravinkumar Gulabrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=8de261729f06eda4a56aba947eceb6140d7406426b2f 08c0117be17a59ec1f07
serialNumber=8f18625adb482a7ee2512cea93ce697385c95a99c89c41e85c05a3de847646bf, cn=Pravinkumar Gulabrao Pawar
Date: 2020.09.21 17:38:13 +05'30'

( प्रविणकुमार पंवार )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत-

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
७) मा.अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मा.सचिव, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई
९) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१०) मा.कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
११) मा.कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१२) मा.कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१३) मा.कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१४) मा.कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१५) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
१६) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१७) संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
१८) निवडनस्ती (विशि-३).